**CNR :- MHSI100003092018**

## –: नियमित दिवाणी मुकदमा क्र. ३८/२०१८ :–

## –: निशाणी ७० वरील आदेश :–

वादीने प्रस्तुतचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. ९ यांच्या कायदेशीर वारसांना अभिलेखासदरी घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यासाठी केलेला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात वादीने असे कथन केले आहे की, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. ९ गणपत बाळा ठाकूर हे दि. २३.०४.२०२१ रोजी मयत झालेले आहेत. सदर प्रतिवादी कोरोना महामारीच्या कालावधीत मयत झालेले असल्याने त्यांचे वारस वेळीच अभिलेखावर दाखल करणे वादीस अडचणीचे झाले होते. सदर प्रतिवादी क्र. ९ हे मयत झालेपासुन पुढील ९० दिवसांमध्ये त्यांचे वारस दाखल करणे वादीस आवश्यक होते. परतु वादी हा आजारी असल्याने व कोरोना महामारीच्या प्रादुर्भावाच्या काळामुळे वेळीच प्रतिवादी क्र. ९ चे वारस अभिलेखासदरी सामील करणे वादीस शक्य झाले नाही. वादीस प्रतिवादी क्र. ९ चे वारस अभिलेखासदरी सामील करण्यासाठी ३ महिने १९ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब माफ करुन प्रतिवादी क्र. ९ चे वारस अभिलेखासदरी सामील करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज वादीने केलेला आहे.

०३. प्रस्तुत अर्जाचे कामी प्रतिवादी क्र. ९ चे वारसांतर्फे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादी क्र. ९अ यांनी म्हणणे दाखल करुन अर्ज मंजूर करण्यास तीव्र विरोध

दर्शविला आहे. प्रतिवादी क्र. ९अ चे म्हणण्यानुसार सदर झालेला विलंब माफ करण्यासाठी दिलेले कारण हे समाधानकारक नसल्याने सदरचा अर्ज नामंजूर करण्याबाबत विनंती केली आहे. प्रतिवादी क्र. ९क याने, प्रतिवादी क्र. ९अ चे म्हणणे स्वीकृत करत असलेबाबतची पुरशीस नि.क्र. ७७ वर दाखल केलेली आहे.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. प्रतिवादी क्र. ९ यांचा मृत्यू दि.२३.०४.२०२१ रोजी झाल्याचे अभिलेखावरुन दिसून येते. दाव्याचे स्वरुप पाहता दावा मिळकती संदर्भात प्रतिवादी क्र. ९ चे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र. ९ चे वारसांनी अर्जास आक्षेप नोंदविला आहे. परंतु त्यांनी अर्जाच्या अनुषंगाने दाखल केलेल्या म्हणण्याचे अवलोकन करता त्यांनी कुठेही प्रतिवादी क्र. ९ चे वारस असल्याचे नाकारलेले नाही. प्रतिवादी क्र. ९ चे वारस अभिलेखावर आणण्यासाठी विलंब झाला आहे. परंतु, केवळ विलंब झाला म्हणुन प्रतिवादी क्र.९ चे वारस अभिलेखावर सादर करण्याची उचित संधी नाकारणे हे नैसर्गिक न्यायतत्वाच्या विरोधी होणार आहे. वादीने अर्जात नमुद केलेले कारण समाधानकारक नाही. अर्ज नामंजूर झाल्यास अर्जाच्या अनुषंगाने विविध कायदेशीर कामे चालविण्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी न्यायपुर्ततेकामी वारस अभिलेखावर आणण्यास झालेल्या विलंबाचे खर्चाच्या स्वरुपात परिमार्जन करुन अर्ज मंजूर करणे उचित वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश करणेत येत आहे.

## –:: <u>आदेश</u> ::–

१. रक्कम रु. ३००/– (रुपये तीनशे मात्र) खर्चाचे आदेश करुन निशाणी ७० वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. रक्कम रु. ३००/– (रुपये तीनशे मात्र) भरल्यानंतर प्रतिवादी क्र. ९ चे वारसांना अभिलेखासदरी घेण्यासाठी झालेला विलंब क्षमापीत करणेत येत आहे.

३. सदरची रक्कम रु.३००/– (रुपये तीनशे मात्र) मोफत विधीसेवा प्राधिकरण (Free Legal Aid) कडे जमा करणेत यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YASHODHAN PRADIP BAVKAR
Date: 2023.02.08 10:58:28 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)

दिनांक – ०७.०२.२०२३ दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) दोडामार्ग.